नियमित दिवाणी दावा क्र.२७७/२०१०

**<u>निशाणी क्र. ४० वरील आदेश</u>**

वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दिलेला आहे.

२. वादींच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरूद्ध दावा मिळकतींची मोजणी करून, बांधहद्दी निश्चित करून, अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी आणि मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींनी हजर होवुन कैफियत दिलेली आहे. त्यानंतर वादींनी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणी केल्यानंतर प्रतिवादींनी वादींच्या ०० हे. ४६ आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे, त्याअनुषंगाने नि.४० वरील अर्जातील मजकुर दाव्यात समाविष्ट करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

३. सदरील अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागवले. प्रतिवादींनी सदरील अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास आक्षेप घेतला आहे.

४. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरूद्ध दावा मिळकतींची मोजणी करून, बांधहद्दी निश्चित करून, अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी आणि मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी हजर होवुन कैफियत दिलेली आहे. त्यानंतर वादींनी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणी केल्यानंतर प्रतिवादींनी वादींच्या क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे मोजणी अहवाल व मोजणी नकाशा यावरून दिसुन येते. त्यामुळे त्या अनुषंगाने वादी ती बाब दाव्यात नमुद करून अतिक्रमीत क्षेत्र ०० हे. ४६ आर प्रतिवादींकडुन काढुन मिळण्यासाठी दाव्यात दुरूस्ती करू इच्छितात. तसेच वादींनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती केल्यास दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. तसेच दाव्याचे मुळ कारण निकाली काढण्यासाठी आणि वादी व प्रतिवादी यांच्यातील भविष्यातील दावे प्रतिदावे टाळण्यासाठी सदरील दुरूस्ती आवश्यक दिसते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी प्रतिवादींना अर्जाचा खर्च म्हणुन प्रत्येकी रूपये ५०/- दयावे.

३. अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादी दाव्यात करू इच्छित असलेली दुरूस्ती त्यांनी आदेश झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करून ती प्रतिवादींना देखिल पुरवावी.

(सौ. आर. एस. भोसले-नरसाळे)
दिनांक :- ०७.०८.२०१७. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, राहाता.